सहायक मर्यादित (विभागीय) स्पर्धा परीक्षा - 2014

पेपर - 2

**A**

**2014**

CODE : **MO5**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

**BOOKLET NO.**

**प्रश्नपुस्तिका क्र. 2**
**मंत्रालय येथे**
**चालणाऱ्या कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती**

**एकूण प्रश्न : 150**

**एकूण गुण : 300**

**वेळ : $2\frac{1}{2}$ (अडीच) तास**

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **150** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**(ब) मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग-"अ" आणि विभाग-"ब" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - अ

1. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशांचे मोल जाणून तो जतन करण्याचा समावेश भारताच्या राज्यघटनेच्या मूलभूत कर्तव्यांमध्ये करण्यात आला आहे हे खरे आहे काय ?

   (1) हे अंशतः खरे आहे (2) हे खरे नाही

   (3) सांगता येत नाही (4) हे पूर्णतः खरे आहे

---

2. पुढील कोणते विधान योग्य आहे ?

   (अ) उपजीविकेचे कितीही साधन मिळण्याचा स्त्रीस हक्क आहे.

   (ब) सारख्या शैक्षणिक पातळीवरील पुरुष व स्त्रियांना समान वेतन मिळावयास हवे.

   **पर्यायी उत्तरे :**

   (1) केवळ (अ) योग्य (2) केवळ (ब) योग्य

   (3) दोन्ही (अ) व (ब) योग्य (4) दोन्ही (अ) व (ब) नाहीत

---

3. पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?

   (अ) अंशतः ही राज्याच्या पैशाने राखलेल्या स्नानघाटावर कोणालाही धर्म व जातीच्या कारणावरून मज्जाव करता येणार नाही.

   (ब) संपूर्णपणे खाजगी मालकीच्या खाद्यगृहासह इतर उपहारगृहात धर्मावरून भेदभाव करता येणार नाही.

   **पर्यायी उत्तरे :**

   (1) केवळ (अ) योग्य (2) केवळ (ब) योग्य

   (3) दोन्ही (अ) व (ब) योग्य (4) दोन्ही (अ) व (ब) अयोग्य

---

4. रिकाम्या जागा भरा :

   राज्य, जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे ________ व ________ हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्वप्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील.

   (1) शैक्षणिक, आर्थिक (2) सामाजिक, सांस्कृतिक

   (3) शैक्षणिक, धार्मिक (4) सांस्कृतिक, धार्मिक

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

5. लोककल्याणकारी राज्य निर्मितीबाबत करावयाच्या उपाययोजना संबंधीच्या सूचना राज्यघटनेत कोठे करण्यात आल्या आहेत ?

(1) मूलभूत कर्तव्ये (2) मार्गदर्शक तत्वे (3) मूलभूत हक्क (4) वैधानिक कार्यपद्धती

---

6. ''राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही'' अशी कायद्यापुढे समानतेची व्याख्या घटनेच्या कोणत्या अनुच्छेद अन्वये करण्यात आली आहे ?

(1) अनुच्छेद 12 (2) अनुच्छेद 17 (3) अनुच्छेद 14 (4) अनुच्छेद 15

---

7. अनुच्छेद 43 प्रमाणे राज्य विशेषत: ग्रामीण क्षेत्रामध्ये कशा कुटीरोद्योगांचे संवर्धन करण्यास प्रयत्नशील राहील ?

(1) सरकारी
(2) सहकारी
(3) वैयक्तिक वा सहकारी
(4) सहकारी वा सरकारी

---

8. जन्मदाता किंवा पालक यांनी आपल्या 6 ते 14 वर्षे वयाच्या पाल्यास शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याबाबत राज्यघटनेत कोठे तरतूद करण्यात आली आहे ?

(1) मूलभूत हक्क
(2) राज्य धोरणांची निदेशक तत्वे
(3) मूलभूत कर्तव्ये
(4) यापैकी नाही

---

9. भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे ?

(1) अनुच्छेद - 16 (2) अनुच्छेद - 17 (3) अनुच्छेद - 18 (4) अनुच्छेद - 19

---

10. योग्य विधान ओळखा :

(अ) भारतीय नागरिक कोणत्याही दुसऱ्या देशाकडून किताब स्वीकारु शकतात.

(ब) राज्याचे मुख्यमंत्री राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय दुसऱ्या देशाकडून भेटवस्तू स्वीकारु शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) (अ) व (ब) योग्य (4) दोन्ही अयोग्य

---

11. निदेशक तत्वात कोणती बाब विशिष्टपणे नमूद नाही ?

(1) कायदेविषयक सहाय्य मोफत उपलब्ध करून देणे.
(2) कामाबाबत मानवीय परिस्थिती निर्माण करणे.
(3) अपंगांना सहाय्य करण्यास्तव परिणामकारक तरतूद करणे.
(4) युवकांना माहिती तंत्रज्ञाना संदर्भात प्रोत्साहित करणे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

12. पूर्णत: राज्याच्या पैशातून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शिक्षण संस्थेत कोणतेही धार्मिक ________.

(1) शिक्षण दिले जाऊ शकते

(2) शिक्षण दिले जाऊ शकत नाही

(3) शिक्षण राज्य शासनाच्या परवानगीने दिले जाऊ शकते

(4) यापैकी नाही

---

13. पुढील कोणते विधान योग्य आहे ?

(अ) अनुच्छेद 45 व अनुच्छेद 51 कलम क (ट) मध्ये केवळ नमूद वयाचा फरक आहे.

(ब) अनुच्छेद 45 व अनुच्छेद 51 कलम क (ट) मध्ये केवळ "जबाबदार" बदलतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही (अ) व (ब) योग्य (2) दोन्ही (अ) व (ब) योग्य नाहीत

(3) केवळ (अ) योग्य (4) केवळ (ब) योग्य

---

14. संविधानाच्या अनुच्छेद 27 नुसार कोणतीही धार्मिक संस्था कोणत्याही व्यक्तीवर, खालीलपैकी ________ देण्याची सक्ती करु शकत नाही.

(1) कर (2) देणगी (3) दान (4) वर्गणी

---

15. अनुच्छेद 15 प्रमाणे राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे पुढीलपैकी कोणत्या कारणावरून भेदभाव करणार नाही ?

धर्म, जात, लिंग, रंग, निवासस्थान

**पर्याय :**

(1) लिंग (2) रंग (3) लिंग व रंग (4) रंग व निवासस्थान

---

16. अनुच्छेद 39 (च) प्रमाणे कोणास शोषणापासून नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण देणे अपेक्षित आहे ?

(1) स्त्रिया (2) स्त्रिया व बालके (3) बालके व युवक (4) स्त्रिया, बालके व युवक

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**17.** रिकाम्या जागा भरा :

कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे ________ किंवा ________ स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

(1) खाजगी, सार्वजनिक
(2) वैयक्तिक, सामाजिक
(3) जिवित, व्यक्तिगत
(4) सार्वजनिक, सांस्कृतिक

---

**18.** पुढील कोणते विधान खरे आहे ?

(अ) निदेशक तत्वात नगरपालिकांचा उल्लेख नाही.

(ब) निदेशक तत्वांन्वये दारूबंदी अपेक्षित आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ) खरे आहे
(2) केवळ (ब) खरे आहे
(3) दोन्ही (अ) व (ब) खरी आहेत
(4) दोन्ही (अ) व (ब) खरी नाहीत

---

**19.** अनुच्छेद 15 मध्ये धर्म व इतर कारणांवरून भेदभाव करता येणार नसला तरी कोणत्या वर्गाच्या उन्नतीकरता विशेष तरतूद करण्यास राज्यास प्रतिबंध असणार नाही ?

(1) सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या
(2) शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या
(3) आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या
(4) शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या

---

**20.** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 30 अन्वये ________ किंवा ________ या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

(1) धर्म, जात
(2) वंश, धर्म
(3) धर्म, भाषा
(4) जात, भाषा

---

**21.** स्वातंत्र्याच्या हक्कानुसार भारतीय नागरिकास भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 19 नुसार पुढील कोणती स्वातंत्र्ये बहाल केली आहेत ?

(अ) भाषण स्वातंत्र्य
(ब) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य
(क) भारतात मुक्तपणे फिरण्याचे
(ड) परदेशात जाण्याचे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब)
(2) फक्त (क) व (ड)
(3) फक्त (अ), (ब) व (क)
(4) (अ), (ब), (क) व (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

22. अनुच्छेद 38 प्रमाणे राज्य विविध घटकांमध्ये प्रेरणा निर्माण करेल असे अपेक्षित असतांना ते कशा न्यायाद्वारे पर्याप्त करेल ?

(1) सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक (2) आर्थिक, राजकीय व शैक्षणिक
(3) सामाजिक, आर्थिक व राजकीय (4) सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय

---

23. स्वातंत्र्याचा हक्क राज्यघटनेत कोणत्या अनुच्छेदात नमूद करण्यात आला आहे ?

(1) अनुच्छेद - 25 (2) अनुच्छेद - 12 (3) अनुच्छेद - 18 (4) अनुच्छेद - 19

---

24. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या कोणत्या नियमान्वये "भारताचा किंवा राज्याचा एकत्रित निधी" या संज्ञेची व्याख्या स्पष्ट केलेली आहे ?

(1) नियम 9 (7) (2) नियम 9 (8) (3) नियम (9) (9) (4) नियम 9 (10)

---

25. भारतात कोणत्याही भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची वेगळी __________ जतन करण्याचा हक्क असेल.

(1) भाषा (2) लिपी (3) संस्कृती (4) वरीलपैकी सर्व

---

26. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या नियम 9 (14) नुसार कर्तव्यामध्ये समाविष्ट असलेल्या नियम 9 (14)(ई) च्या (एक)(दोन)(तीन) मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक सक्तीच्या परिक्षेसाठी परीक्षेच्या ठिकाणी जाण्याचा व तेथून येण्याचा योग्य वेळ जमेस धरुन परीक्षांना बसण्यासाठी लागणारा कालावधी संदर्भातील कर्तव्य कालावधीची सवलत कितीपेक्षा अधिक वेळा देण्यात येऊ नये ?

(1) दोना पेक्षा (2) तीना पेक्षा (3) एका पेक्षा (4) पाचा पेक्षा

---

27. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम, 1981 च्या नियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याच्या संबंधात शासन किंवा ज्यांस या नियमांद्वारे किंवा त्या अन्वये अधिकार प्रत्यायोजित केला असेल अशा कोणत्याही प्राधिकाऱ्यास काय म्हणतात ?

(1) कक्ष अधिकारी (2) अवर सचिव
(3) विशेष प्राधिकारी (4) सक्षम प्राधिकारी

---

28. महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय शासकीय कर्मचारी कोठे साक्ष देऊ शकेल ?

(1) दूरचित्रवाणी वरील कार्यक्रमात शासकीय धोरणांवर टीकात्मक साक्ष
(2) खाजगी समितीसमोर साक्ष
(3) खाजगी प्राधिकरणाने आयोजित केलेल्या चौकशीमध्ये साक्ष
(4) विभागीय चौकशीतील साक्ष

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

29. ज्याला वेतन किंवा रजा वेतन मिळत नाही अशा शासकीय कर्मचाऱ्याला दिली जाणारी मासिक रक्कम म्हणजे ________ होय.

(1) मासिक पगार (2) ठोक रक्कम (3) निर्वाह भत्ता (4) मानधन

---

30. शासकीय कर्मचाऱ्याचे जन्माचे वर्ष व महिना माहित आहे, पण नेमकी तारीख माहित नसल्यास त्या महिन्याची ________ तारीख ही त्याची जन्मतारीख मानण्यात यावी.

(1) 1 (2) 10 (3) 16 (4) 30

---

31. श्री. जाधव हे राज्य शासनाच्या कार्यालयात काम करीत आहेत. त्यांनी 31 ऑगस्ट रोजी "व्यसनाचे दुष्परिणाम" या विषयावर वैज्ञानिक लेख महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केला. श्री. जाधव यांच्या कृतीबाबत खालील पर्यायांपैकी कोणता पर्याय महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार योग्य आहे ?

(1) श्री. जाधव यांनी शासनाची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक होते.

(2) शासनाच्या मंजुरीची आवश्यकता नाही.

(3) केलेली कृती शासनास कळविणे आवश्यक होते.

(4) श्री. जाधव यांची वरील कृती पूर्णपणे अयोग्य आहे.

---

32. प्रवासाच्या नेहमीच्या साधनाने मुख्यालयापासून दौऱ्याच्या नियोजित गंतव्य स्थानापर्यंत किंवा मुख्यालयेतर एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा प्रत्यक्ष काळ म्हणजे ________ काळ.

(1) कार्यप्रवण (2) संक्रमण (3) सावधि (4) यापैकी नाही

---

33. शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाबाबत खालीलपैकी कोणती विधाने चुकीची आहेत ?

(अ) शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक दोन प्रतींमध्ये ठेवले पाहिजे.

(ब) शासकीय कर्मचाऱ्याने प्रथमत: शासकीय सेवेतील अस्थायी पद धारण केले असेल तर त्याचे सेवा पुस्तक ठेवण्याची आवश्यकता रहात नाही (एक वर्षाहून अधिक काळासाठी नियुक्ती पुढे चालू रहाणार).

(क) सेवा पुस्तकाची एक प्रत शासकीय कर्मचाऱ्याला देण्याची आवश्यकता नसते.

(ड) सेवापुस्तकाच्या प्रती विनामूल्य ठेवल्या जातात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) व (क) (2) (अ) व (ड)

(3) सर्व विधाने बरोबर (4) (अ), (ब) व (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

34. कोणत्या राज्यातील वैद्यक व्यवसायी नोंदणीसंबंधीच्या अधिनियमानुसार नोंदणी केलेला वैद्यक व्यवसायी म्हणून महाराष्ट्रात वैद्यक व्यवसाय करू शकतो ?

(1) फक्त महाराष्ट्र व गोवा राज्यातील
(2) फक्त महाराष्ट्रातील
(3) कोणत्याही राज्यातील
(4) वरीलपैकी काहीच बरोबर नाही

---

35. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियमातील तरतुदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यास शासनाची पूर्वमंजूरी मिळविल्याखेरीज खालील पर्यायांमधील कोणता खाजगी व्यापार किंवा काम करता येईल ?

(1) शासकीय कर्मचाऱ्याच्या पत्नीच्या नावे असलेल्या विमा एजन्सीचे काम पहाणे.
(2) कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत व वेळेनंतर खाजगी शिकवणी घेणे.
(3) लोकसत्ता/महाराष्ट्र टाईम्स सारख्या वृत्तपत्रांमध्ये प्रत्येक रविवारी ''वैज्ञानिक कुतूहल' या विषयावर पूर्णपणे वैज्ञानिक स्वरूपाचे स्तंभलेखन करणे.
(4) शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबाच्या मालकीच्या 'कमिशन एजन्सी' चे काम पहाणे.

---

36. खालील विधानांपैकी 'बरोबर' विधान ओळखा.

(अ) विभाग प्रमुखाने आदेश दिलेला असल्याखेरीज, वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्रांची सेवापुस्तकात नोंद करु नये.
(ब) कार्यालय प्रमुखाने शासकीय कर्मचाऱ्यांना सेवा पुस्तके दाखवू नयेत.
(क) बदलीनंतरही सेवापुस्तक जतन करुन ठेवावे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरीलपैकी सर्व विधाने बरोबर
(2) केवळ (अ) बरोबर
(3) केवळ (ब) बरोबर
(4) केवळ (क) बरोबर

---

37. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 मधील तरतुदीनुसार विवाह, वर्षदिन, अंत्यसंस्कार किंवा धार्मिक समारंभाच्या वेळी, गट 'क' चे कोणतेही पद धारण करणारा शासकीय कर्मचारी ________ पेक्षा जास्त देणगी त्याच्या जवळच्या नातेवाईकाकडून मिळाल्यास तो तसे शासनाला कळवील.

(1) ₹ 5,000
(2) ₹ 2,000
(3) ₹ 4,000
(4) ₹ 7,000

---

38. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियमांचा अर्थ लावण्याच्या संदर्भात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, त्यावरील अंतिम निर्णय कोणाचा असतो ?

(1) शासन
(2) मा. उच्च न्यायालय
(3) महाराष्ट्र लोकसेवा आयोग
(4) संबंधित प्रशासकीय विभागातील कार्यासन अधिकारी

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

39. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियमातील तरतुदीनुसार मान्यता प्राप्त नसलेल्या संघटनेने शासकीय कर्मचाऱ्यांच्या 7 व्या वेतन आयोगाच्या संबंधात आवळे शिष्टमंडळ अभिवेदनासह मा. मुख्यमंत्र्यांना भेटण्यास पाठविले. तथापि मा. मुख्यमंत्र्यांनी त्यांची भेट नाकारली व अभिवेदनही स्वीकारले नाही. ही कृती योग्य अथवा अयोग्य हे नियमातील तरतुदीनुसार ठरवा :

(1) मा. मुख्यमंत्री यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे यास्तव कृती अयोग्य.

(2) मान्यता प्राप्त नसलेल्या संघटनेस शिष्टमंडळ पाठविण्याचा वा अभिवेदन देण्याचा हक्क नसल्याने कृती योग्य.

(3) 7 व्या वेतन आयोग ही बाब शासकीय कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याची बाब असल्याने मा. मुख्यमंत्री यांची कृती अयोग्य.

(4) शासकीय कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही बाबीसंदर्भात कोणतीही संघटना कोणासही भेटू शकते, अभिवेदन देऊ शकते यास्तव कृती अयोग्य.

---

40. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या नियमांतील तरतुदी अनुसार ज्या सेवेतील शासकीय कर्मचाऱ्याला भारताच्या किंवा राज्याच्या किंवा संघ-राज्यक्षेत्राच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही उत्पन्नाच्या साधनातून शासनाच्या मंजूरीने वेतन मिळते अशी सेवा कोणती ?

(1) अस्थायी सेवा (2) ऐच्छिक सेवा (3) स्वीयेत्तर सेवा (4) पूरक सेवा

---

41. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संबंधात खालील विधाने पहावीत :

(अ) सहलीच्या ठिकाणी स्वत:च्या वाहनात तो मद्यसेवन करु शकतो.

(ब) पाच दिवसाचा आठवडा व्हावा म्हणून तो शासनाच्या पूर्व-परवानगीशिवाय संघटनेसोबत संपावर जाऊ शकतो.

याबाबत योग्य पर्याय कोणता ?

(1) केवळ (अ) बरोबर (2) केवळ (ब) बरोबर

(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

---

42. (अ) सेवापुस्तके व सेवा पट यांची पडताळणी प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर मध्ये करावी.

(ब) कार्यालय प्रमुख शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा, त्याच्या सेवापटात नियमानुरूप असल्याची खात्री करेल.

म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 मधील तरतुदींच्या आधारे वरील विधानापैकी कोणते विधान चूक आहे ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) दोन्ही बरोबर (2) (अ) चूक तर (ब) बरोबर

(3) (अ) बरोबर तर (ब) चूक (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**43.** सावधि- नियुक्ति पद म्हणजे काय ?

(1) एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याची पुनर्नियुक्ती न होता त्याला मर्यादित कालावधीपेक्षा अधिक काळ जे पद धारण करता येणार नाही असे पद.

(2) शासकीय कर्मचाऱ्यास पुनर्नियुक्ती मिळवून धारण करता येणारे पद.

(3) अमर्यादित काळापर्यंत धारण करता येणारे पद

(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**44.** शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या पदाच्या नात्याने खालीलपैकी कोणत्या माध्यमाशी संपर्क साधण्यास पूर्णतः प्रतिबंध करण्यात आला आहे ?

(1) वृत्तपत्रे (2) आकाशवाणी (3) दूरदर्शन (4) वरीलपैकी कोणत्याच नाही

---

**45.** श्री. देवरे, गट 'क' चे शासकीय कर्मचारी ह्यांनी 16 एप्रिल 2000 रोजी शासन सेवेत प्रवेश केला. त्यांची जन्मतारीख दि. 22 ऑगस्ट 1978 नसून दि. 3 ऑगस्ट 1980 असल्याबाबतचा पुरावा त्यांनी दि. 25 मे 2010 रोजी संबंधित विभागास सादर केला व सेवापुस्तकात नोंदलेल्या जन्मतारखेमध्ये बदल करण्याचा विनंती अर्ज कार्यालय प्रमुखास सादर केला. नियमानुसार कार्यालय प्रमुखाने कोणती कार्यवाही करावी ?

(1) श्री. देवरे यांच्या अर्जाचा विचार करुन सेवापुस्तकातील जन्मतारखेत फेरबदल करावा.

(2) श्री. देवरे यांनी पुरावा सादर केला असल्याने सेवापुस्तकात नवीन जन्मतारीख नोंदवावी.

(3) श्री. देवरे यांच्या अर्जाचा विचार करता येणार नाही कारण सेवा प्रवेशाच्या तारखेनंतर 10 वर्षांनी अर्ज केला आहे.

(4) श्री. देवरे यांच्या अर्जाची छाननी करावी.

---

**46.** ज्या राजपत्रित कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आस्थापनेच्या देयकांवर कार्यालय प्रमुखांकडून काढण्यात येतात त्यांच्या व्यतिरिक्त, प्रत्येक राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याचे सेवाभिलेख ________ सुस्थितीत ठेवील.

(1) कार्यालय प्रमुख (2) विभाग प्रमुख

(3) आहरण व संवितरण अधिकारी (4) लेखापरीक्षा अधिकारी

---

**47.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियमातील तरतुदीनुसार खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत शासकीय कर्मचाऱ्याने खाजगी व्यापार किंवा नोकरी केली असे समजले जाणार नाही.

(1) त्याच्या पत्नीच्या मालकीच्या विमा एजन्सीचे काम पहाणे.

(2) कार्यालयीन वेळेत खाजगी शिकवणी घेणे.

(3) सहकारी बँकेच्या व्यवस्थापनामध्ये सहभागी होणे.

(4) वरील एकही नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**48.** ''देणग्या'' संदर्भातील म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतुदीनुसार खालील जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (अ) गट अ चा कर्मचारी विवाह प्रसंगी | (i) जवळच्या नातेवाईकाकडून ₹ 1000 पर्यंतची देणगी स्वीकारू शकतो |
| (ब) गट क चा कर्मचारी इतर प्रसंगी | (ii) वैयक्तिक मित्रांकडून ₹ 1500 पर्यंत मूल्याची देणगी स्वीकारू शकतो |
| (क) गट ड चा कर्मचारी धार्मिक समारंभ प्रसंगी | (iii) इतर कोणत्याही बाबतीत ₹ 500 पर्यंत मूल्याची देणगी स्वीकारू शकतो |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) |
|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) |
| (3) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (i) | (iii) | (ii) |

**49.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 __________ रोजी अंमलात आले.

(1) दि. 2 जुलै 1979 (2) दि. 12 जून 1979 (3) दि. 20 एप्रिल 1979 (4) दि. 12 जुलै 1979

**50.** महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या तरतुदीनुसार शिबिर सरंजाम या संज्ञेत कोणाचा समावेश होत नाही ?

(1) शिबिर सामग्री वाहून नेणारे उंट (2) ओझेवाहू बैल, बैलगाड्या, गाडीवान

(3) तंबू ठोकणारे नोकर (4) खाजगी अथवा जादा नोकर

**51.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियम 29 अन्वये मान्यता पाहिजे असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या औद्योगिकेतर संघटनेमध्ये सर्वसाधारणपणे कोणत्या वर्गाचा समावेश असावयास हवा ?

(1) गट अ, ब, व क वर्ग

(2) फक्त वर्ग क

(3) गट अ ते गट ड पर्यंत सर्व वर्ग

(4) विशिष्ट वर्ग

**52.** गट (ब) च्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या विवाहाप्रसंगी खालीलपैकी किती रकमेपेक्षा जास्त देणगी जवळच्या नातेवाईकाकडून स्वीकारल्यास त्याने ही बाब शासनास कळविणे आवश्यक आहे ?

(1) ₹ 2500 (2) ₹ 4000 (3) ₹ 1500 (4) ₹ 3500

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

53. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या नियमांतील तरतुदीनुसार एखाद्या क्षेत्रातील खर्चिक राहणीमान किंवा रोगट परिस्थिती लक्षात घेऊन त्या क्षेत्रात ज्यांची मुख्यालये आहेत, त्या शासकीय कर्मचाऱ्यांना कोणता भत्ता अनुज्ञेय असतो ?

(1) विशेष भत्ता (2) धुलाई भत्ता (3) प्रवास भत्ता (4) स्थानिक भत्ता

---

54. नेत्रदोषाव्यतिरिक्त कोणत्याही विकलांगतेच्या कारणावरुन वैद्यकीय अधिकाऱ्याने शासकीय सेवेकरिता आलेल्या उमेदवारास अपात्र ठरविले असेल तेव्हा अशी विकलांगता माफ करण्याचे अधिकार कोणास आहेत ?

(1) मुख्यमंत्री (2) विभागाचे मंत्री

(3) संचालक, आरोग्य सेवा (4) विभागाचे सचिव

---

55. 'श्री. पांडे' या वर्ग 'अ' च्या शासकीय अधिकाऱ्याने त्याच्या जिल्ह्यातील रुग्णालयास स्वत:चे नाव दिले. श्री. पांडे यांची ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियमातील तरतुदीनुसार वैध अथवा अवैध आहे हे खालील पर्यायांच्या आधारे ठरवा :

(1) श्री. पांडे यांची ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 25 नुसार अवैध ठरते.

(2) श्री. पांडे यांची ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 24 नुसार अवैध ठरते.

(3) श्री. पांडे यांची ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 23 नुसार अवैध ठरते.

(4) श्री. पांडे यांची ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार वैध ठरते.

---

56. शासकीय कर्मचाऱ्याने राजकारण व निवडणुका यांमध्ये सहभागी होणे, याअनुषंगाने खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(अ) कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा संघटनेचा सदस्य होता येईल.

(ब) कोणताही शासकीय कर्मचारी विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणूकीत प्रचार करू शकणार नाही.

(क) शासकीय कर्मचारी शरीरावर, वाहनावर किंवा निवासस्थानावर कोणतेही निवडणूक चिन्ह लावू शकतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व बरोबर (2) केवळ (ब) बरोबर

(3) (अ) व (क) बरोबर (4) (ब) व (क) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

57. खालील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.

(अ) वेतनामध्ये विशेष वेतनाचा समावेश आहे.

(ब) वेतनामध्ये गट विमा योजनेच्या हप्त्याचा समावेश आहे.

(क) वेतनामध्ये विशेष महागाई वेतनाचा समावेश आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर
(2) (अ) व (क) बरोबर
(3) (ब) व (क) बरोबर
(4) (अ) (ब) व (क) बरोबर

---

58. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या कोणत्या नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्याला राजकारणामध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे ?

(1) नियम 4
(2) नियम 5
(3) नियम 8
(4) नियम 9

---

59. सेवापुस्तकामध्ये नोंद करणे संदर्भात कोणते विधान बरोबर आहे ?

(अ) शासकीय कर्मचाऱ्यास जेव्हा पदावनत केले जाते/सेवेतून काढून टाकले जाते तेव्हा "अकार्यक्षमतेबद्दल पदावनत केले" / "सेवेतून काढून टाकले" याप्रमाणे नमूद करून नोंद केली पाहिजे.

(ब) अशा नोंदी करण्याचे काम अराजपत्रित कर्मचाऱ्यावर सोपवू नये.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर
(2) फक्त (ब) बरोबर
(3) फक्त (अ) बरोबर
(4) दोन्ही विधाने बरोबर नाहीत

---

60. श्रीमती गावडे, विक्रीकर अधिकारी, गट 'ब' यांना त्यांची कन्या शीतलच्या वाढदिवस प्रसंगी त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकडून ₹ 3850 इतकी देणगी प्राप्त झाली. या कृतीबाबत खालील कोणता पर्याय योग्य आहे ?

(1) त्यांनी देणगी स्वीकारणे योग्य नाही
(2) त्यांनी शासनास कळविणे आवश्यक आहे
(3) म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतुदींचा भंग केला आहे
(4) म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील नियमांचा भंग केला नाही

---

61. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 नुसार खाली नमूद केलेला कालावधी मोजल्यास दिनांक 10 जानेवारी 2012 ते दिनांक 5 एप्रिल 2012 या कालावधीत किती महिने व दिवस येतील ?

(1) 3 महिने 27 दिवस
(2) 2 महिने 27 दिवस
(3) 2 महिने 28 दिवस
(4) 2 महिने 26 दिवस

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

62. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या नियमानुसार प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कर्मचाऱ्यांना मागील वित्तिय वर्षात सेवा पुस्तके दाखवून, त्यांनी तपासली असल्याची कार्यवाही केल्याचे प्रमाणपत्र दरवर्षी कोणत्या महिन्याच्या अखेरीस वरिष्ठ अधिकाऱ्यास सादर केले पाहिजे ?

(1) जानेवारी (2) एप्रिल (3) जुलै (4) सप्टेंबर

---

63. शासकीय कर्मचाऱ्यास, भारतीय नागरिक नसलेल्या व्यक्तीशी विवाह करावयाचा असल्यास खालीलपैकी कोणती कृती करणे आवश्यक आहे ?

(1) विवाह ही वैयक्तिक बाब आहे, त्यामुळे शासनास कळविण्याची आवश्यकता नाही.

(2) विवाह केल्याबद्दल धार्मिक संस्थेस कळवावे.

(3) अशा विवाहाबद्दल शासनास तात्काळ कळविले पाहिजे.

(4) अशा विवाहाबद्दल फक्त न्यायालयाला कळवावे.

---

64. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या नियमानुसार प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याने त्याची स्थायी पदावर कायमपणे नियुक्ती होण्यापूर्वी किंवा नियुक्तीच्या तारखेपासून किती महिन्यांची सेवा पूर्ण होण्यापूर्वी आरोग्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले पाहिजे ?

(1) 18 महिने (2) 6 महिने (3) 9 महिने (4) 12 महिने

---

65. विवाह, वर्षदिन, अंत्यसंस्कार किंवा धार्मिक समारंभाव्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबतीत गट 'क' मधील शासकीय कर्मचाऱ्यास खालीलपैकी किती मूल्यापेक्षा अधिक मूल्य असलेली देणगी शासनाच्या मंजूरीशिवाय स्वीकारता येत नाही ?

(1) ₹ 500 (2) ₹ 1000 (3) ₹ 2000 (4) ₹ 1500

---

66. म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार "देणगी" या संज्ञेमध्ये पुढीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश करण्यात येईल ?

(अ) शासकीय कर्मचाऱ्याशी कोणताही कार्यालयीन व्यवहार न करणाऱ्या जवळच्या मित्राने दिलेली मर्यादित मूल्य असलेली भेटवस्तू

(ब) प्रासंगिक भोजन, स्वत:च्या वाहनातून नेणे किंवा इतर सामाजिक कारणाप्रित्यर्थ केलेला पाहुणचार

(क) कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या व्यक्तीने देऊ केलेली विनामूल्य वाहतूक, भोजन, निवास व्यवस्था वा इतर सेवा

योग्य पर्याय निवडा.

(1) फक्त (क) (2) (अ), (ब), (क) (3) (अ) व (ब) (4) (ब) व (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

67. श्री. 'क्ष' हे गट क चे शासकीय कर्मचारी असून ते कार्यालयात नेहमीच उशीरा उपस्थित राहतात. त्यांच्यावर सोपविलेले कोणतेही काम ते करीत नाहीत. शिवाय खोटेपणाने वागून आपल्या काम न करण्याच्या कृतीस अन्य कर्मचारी जबाबदार असल्याचे दर्शवितात. श्री. 'क्ष' यांची ही कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील कोणत्या नियमाचा भंग करणारी आहे हे स्पष्ट करा.

(1) नियम 5 (2) नियम 4 (3) नियम 3 (4) नियम 12

---

68. शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या घरगुती कामाकरिता 14 वर्षाखालील मुलास नोकरीस ठेवता येईल काय? म.ना.से. (वर्तणूक) नियमांनुसार खालील पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.

(1) अजिबात ठेवता येणार नाही.

(2) मुलास झेपेल त्या कामासाठी ठेवता येईल.

(3) कोणत्याही कामासाठी ठेवता येईल.

(4) मुलास शिक्षणासाठी अर्थार्जन करावयाचे असल्यास ठेवता येईल.

---

69. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम 11 नुसार, कोणताही शासकीय कर्मचारी शासनाच्या किंवा विहित प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीखेरीज कोणत्याही उद्दिष्टाला अनुलक्षून कोणताही निधी उभारण्यासाठी वर्गणी मागू शकणार नाही किंवा देऊ शकणार नाही. या नियमाच्या तरतुदी खालीलपैकी कोणत्या बाबींसाठी लागू असणार नाहीत, तो पर्याय निवडा :

(अ) नियतवयोमानानुसार सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याला भेट देण्यासाठी.

(ब) नॅशनल फाऊंडेशन फॉर कम्युनल हार्मनी यांच्याकडून उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधी उभारण्यासाठी.

(क) धार्मिक कार्यासाठी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (क) (2) केवळ (ब) (3) (ब) व (क) (4) केवळ (अ)

---

70. शासकीय कर्मचाऱ्याने एखाद्या पदाचा कर्तव्यभार मध्यान्होत्तर स्वीकारला असल्यास त्याला कोणत्या दिवसापासून त्या पदाचे वेतन व भत्ते मिळतात?

(1) त्या दिवसापासून (2) त्यानंतरच्या दिवसापासून

(3) त्या दिवसाच्या आधीच्या दिवसापासून (4) यापैकी कोणतेही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

71. म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1971 मधील तरतुदीनुसार दिवस म्हणजे एका ________ पासून सुरू होणारा व दुसऱ्या ________ संपणारा कालावधी होय.

(1) सकाळ, संध्याकाळी (2) सकाळ, मध्यरात्री
(3) सकाळ, सकाळ (4) मध्यरात्री, मध्यरात्री

---

72. उच्च सेवा म्हणजे ________ ची सेवा होय.

(1) वर्ग एक, दोन, तीन, चार (2) वर्ग एक, दोन, तीन
(3) वर्ग एक, दोन (4) वर्ग एक

---

73. प्रत्येक कार्यालयातील सेवा पुस्तके व सेवा पट यांची पडताळणी, प्रत्येक वर्षाच्या मे महिन्यामध्ये ________ करावी.

(1) लेखापरीक्षा अधिकाऱ्याने (2) विभाग प्रमुखाने
(3) प्रादेशिक प्रमुखाने (4) कर्मचाऱ्याने

---

74. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतुदींनुसार "जंगम मालमत्ता" या संज्ञेमध्ये खालीलपैकी कोणत्या गोष्टींचा समावेश होतो ?

(अ) मोटारगाड्या, मोटार सायकली, घोडे, रेफ्रीजरेटर, रेडिओ, शेअर, रोखे, ऋणपत्रे
(ब) शासकीय कर्मचाऱ्याच्या नावे असलेली सदनिका
(क) शासकीय कर्मचाऱ्याच्या नावे असलेली पडीक जमीन
(ड) शासकीय कर्मचाऱ्याच्या नावे असलेली बागायती जमीन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (ड) (2) फक्त (अ)
(3) (अ), (ब) व (क) (4) वरील सर्व पर्यायांचा समावेश होतो

---

75. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियम 29 संदर्भातील परिशिष्ट शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता देण्याकरिता असलेल्या शर्तींनुसार संघटनेमध्ये ज्या वर्गाचे प्रतिनिधीत्व केले जाते, त्या वर्गातील शासकीय औद्योगिकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी *किमान* किती टक्के कर्मचारी अशा संघटनेचे सदस्य असले पाहिजेत ?

(1) 20 टक्के (2) 25 टक्के (3) 15 टक्के (4) 10 टक्के

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - ब

76. आम आदमी वीमा योजना कोणासाठी राबविण्यात येत आहे ?

(1) जेष्ठ नागरीक
(2) निराधार जनता
(3) ग्रामीण निरक्षर जनता
(4) भूमिहीन शेतमजूर/अल्पभूधारक

77. टपालाचे अवलोकन केल्यानंतर सहायकाने त्या आवकपत्राची नोंद कोठे करणे आवश्यक आहे ?

(1) आवक नोंदवही
(2) कार्यविवरण पत्र
(3) गोपनीय अहवाल
(4) निर्देश पत्र

78. कोणाच्या आदेशाशिवाय गोपनीय फाईल दुसऱ्या विभागाकडे पाठविण्यात येत नाही ?

(अ) अवर सचिव (ब) उपसचिव (क) सहसचिव (ड) विभागाचे सचिव

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (क) व (ड)
(2) (अ), (ब), (क) व (ड)
(3) फक्त (ब), (क) व (ड)
(4) फक्त (ड)

79. अडचणीतील महिलांना मदत उपलब्ध करण्यासाठी मुंबई ठाणे आणि नवी मुंबईसाठी आणि इतर राज्यासाठी कोणते टोल फ्री क्रमांक निर्माण करण्यात आले आहेत ?

(1) मुंबई - 103, राज्य - 1091
(2) मुंबई - 101, राज्य - 1090
(3) मुंबई - 105, राज्य - 1095
(4) मुंबई - 110, राज्य - 1080

80. शासकीय जागांतून निष्कासन कलमाबाबतचा अधिनियम कोणत्या विभागाच्या अधिनस्त आहे ?

(1) सामान्य प्रशासन विभाग
(2) सार्वजनिक बांधकाम विभाग
(3) महसुल विभाग
(4) गृहनिर्माण विभाग

81. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने, शाळेतील विद्यार्थ्यांची पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी व गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाचा उपक्रम/कार्यक्रम कोणता ?

(1) आंगणवाडी योजना
(2) शालेय पोषण आहार कार्यक्रम
(3) सावित्रीबाई फुले दत्तक योजना
(4) पट-पडताळणी अभियान

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

82. ज्या प्रश्नांची उत्तरे विधानमंडळात देण्यात येतात, परंतू ज्यावर कोणतेही पुरवणी प्रश्न विचारता येत नाहीत अशा प्रश्नांना कोणते प्रश्न म्हणतात ?

(1) तारांकित (2) अतारांकित (3) अल्पसूचना (4) लक्षवेधीसूचना

83. गावातील जनतेला पारदर्शक, दर्जेदार आणि गतिमान सेवा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत कोणता कार्यक्रम राबविण्यात येत आहे ?

(1) विक्रांत (2) संग्राम (3) निशांत (4) प्रशांत

84. शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मध्ये खालीलपैकी कोणती तरतूद नाही ?

(1) नागरिकांची सनद तयार करणे. (2) माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करणे.

(3) कार्यालयीन रिक्त पदे तातडीने भरणे. (4) अंतिम निर्णय घेण्यासाठी अधिकाऱ्यांचा स्तर निर्धारण करणे.

85. प्राथम्य क्रम व प्रकरणे सादर करण्याचा कालावधीबाबत जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | सर्वसाधारण | (i) | 24 तास |
| (ब) | तात्काळ | (ii) | चार दिवस |
| (क) | तानडी | (iii) | एक आठवडा |
| (ड) | चर्चा | (iv) | त्याच दिवशी/दुसऱ्या दिवशी सकाळी |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

86. कोणते विधान बरोबर आहे ?

(अ) एकापेक्षा अधिक विभागांचा कार्यभार एकाच सचिवांकडे सोपविता येणार नाही.

(ब) एकाच विभागाचे काम दोन किंवा अधिक सचिवांमध्ये देता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (2) (ब) बरोबर

(3) (अ) आणि (ब) दोन्ही बरोबर (4) (अ) आणि (ब) दोन्ही चूक

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**87.** मंत्रालयीन विभागांमध्ये शासनाचे कामकाजाचे वर्गीकरण व वितरण शासन कार्यनियमावली च्या कोणत्या अनुसूचित कलमात आले आहे ?

(1) चौथ्या (2) तिसऱ्या (3) दूसऱ्या (4) पहिल्या

---

**88.** मंत्रिमंडळामध्ये कोणाचा समावेश असतो ?

(अ) मुख्यमंत्री (ब) कॅबिनेट मंत्री (क) राज्यमंत्री (ड) उपमंत्री

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब) (2) फक्त (अ), (ब) व (क)

(3) फक्त (अ), (ब) व (ड) (4) (अ), (ब), (क) व (ड)

---

**89.** चालू नस्तीवरील कागदपत्रांवर कोणत्या चिठ्या लावता येतील ?

(1) 'महत्वाचे', विचाराधीन कागद

(2) 'मान्यतेसाठी प्रारुप', 'विचाराधीन कागदपत्रे' 'महत्वाचे'

(3) 'विचाराधीन कागद' 'मान्यतेसाठी प्रारुप' व इतर पताका

(4) 'विचाराधीन कागद' व 'मान्यतेसाठी प्रारुप'

---

**90.** महाराष्ट्रात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेला कधी सुरुवात झाली ?

(1) दिनांक 2 फेब्रुवारी, 2006 (2) दिनांक 2 ऑक्टोबर, 2006

(3) दिनांक 2 जानेवारी, 2007 (4) दिनांक 2 मार्च, 2008

---

**91.** खालीलपैकी अचूक विधान ओळखा.

(अ) अधिकाऱ्यांच्या नावे आलेली सर्व पाकिटे नोंदणीशाखेत उघडण्यात यावीत.

(ब) पत्रे निर्गमित करताना त्यावर मंजूरीचा व सही केल्याचा असे दिनांक नमूद करावेत.

(क) अभिलेख कक्षाकडून दुसऱ्या विभागाची फाईल हवी असल्यास त्या विभागाची लेखी संमती घेतली पाहिजे.

(ड) प्रकरण दप्तरीदाखल करताना तिचे वर्गीकरण लिपिकाने करावे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व (2) केवळ (अ) (3) केवळ (क) (4) केवळ (ब)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**92.** योग्य विधान सांगा.

(अ) राज्यपालांच्या टिप्पण्या किंवा अभिप्राय राज्यपालांनी अनुदेश दिल्याखेरीज मंत्रालय अभिलेखामध्ये घेण्यात येत नाहीत.

(ब) शिक्षा माफ करणे, तहकुब करणे याबाबतचे प्रस्ताव मुख्यमंत्री आदेश काढण्यापूर्वी राज्यपालांना सादर करतील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही (4) यापैकी नाही

---

**93.** मंत्रालयीन विभागाच्या नावे असलेली सर्व पत्रे कोठे स्वीकारण्यात येतात ?

(1) सचिवांच्या कार्यालयात (2) मुख्य सचिवांच्या कार्यालयात

(3) विभागातील मध्यवर्ती नोंदणी शाखेत (4) मंत्रालयाच्या स्वागत कक्षात

---

**94.** सायंकाळी 6.30 नंतर प्राप्त होणारे तातडीचे टपाल सध्या मंत्रालयात कोठे स्विकारण्यात येते ?

(1) नोंदणी शाखा (2) संबंधित कार्यासन (3) आस्थापना शाखा (4) नियंत्रण कक्ष

---

**95.** "सी वर्ल्ड" हा प्रकल्प कशासंदर्भात आहे ?

(1) मत्स्य विकास (2) समुद्राच्या पाण्याचा अभ्यास

(3) पर्यटनविषयक (4) यापैकी नाही

---

**96.** मंत्रालयीन नोंदणी शाखेच्या प्रत्येक पत्रव्यवहाराकरिता __________ ही आज्ञावली तयार करण्यात आलेली आहे. सदर आज्ञावलीमुळे प्रत्येक धारिका व संदर्भाची सद्य:स्थिती लक्षात येते.

(1) संपर्क (2) सहयोग (3) सहज (4) शोध

---

**97.** भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाद्वारे 'महाराष्ट्र शासन कार्य नियमावली' तयार करण्यात आली आहे ?

(1) 465 (2) 265 (3) 166 (4) 165

---

**98.** शासकीय परिवहन सेवाचे कामकाज कोणत्या विभागाच्या अधिनस्त आहे ?

(1) सार्वजनिक बांधकाम विभाग (2) परिवहन विभाग

(3) सामान्य प्रशासन विभाग (4) गृह विभाग

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

99. ज्येष्ठ नागरीक धोरणामध्ये खालीलपैकी कोणती बाब समाविष्ट आहे ?

(अ) 65 वर्षे वयावरील नागरिकांना विविध योजनांचा लाभ

(ब) आई वडीलांचा सांभाळ न करणाऱ्या मुलांची नावे प्रसिद्ध करणे

(क) ज्येष्ठांसाठी समुपदेशन केंद्रांची स्थापना

(ड) दर 10 वर्षांनी धोरणाचे पुनर्विलोकन करणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व
(2) एकही नाही
(3) केवळ (अ), (ब) व (क)
(4) केवळ (ब), (क) व (ड)

---

100. नवसंजीवन योजनेमध्ये खालीलपैकी कोणत्या कार्यक्रमांचा समावेश आहे ?

(अ) रोजगार कार्यक्रम (ब) आरोग्य सेवा (क) अन्नधान्याचा पुरवठा (ड) खावटी कर्ज योजना

(इ) धान्य कोष योजना

**पर्यायी उत्तरे :**

(1) एकही नाही
(2) वरील सर्व
(3) केवळ (ड) व (इ)
(4) केवळ (अ), (ब) व (क)

---

101. 'महालक्ष्मी सरस' ही योजना कोणत्या विभागामार्फत राबविली जाते ?

(1) कृषी विभाग
(2) सहकार विभाग
(3) नगरविकास विभाग
(4) ग्रामविकास विभाग

---

102. गोसेखुर्द जलसिंचन प्रकल्प कोणत्या जिल्ह्यात आहे ?

(1) चंद्रपूर (2) गडचिरोली (3) भंडारा (4) नागपूर

---

103. सामान्यतः कोणत्या वेळेनंतर स्वीकारलेली आवकपत्रे पुढील कामाच्या दिवशी वाटपासाठी ठेवण्यात येतील ?

(1) दुपारी 3.00 (2) दुपारी 4.00 (3) दुपारी 4.30 (4) सायंकाळी 5.15

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**104.** मंत्रालयीन विभागांमध्ये संदर्भावर कार्यवाही करण्यासाठी कोणकोणत्या प्रकारची प्राथम्यक्रम चिन्हे वापरण्यात येतात ?

(अ) तातडीचे (ब) तात्काळ (क) टंचाई प्राथम्य (ड) विधानसभा/विधानपरिषद प्रश्न/ठराव
(ई) निकडीचे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ), (ब), (ई) (2) फक्त (अ), (ब) व (ड)
(3) फक्त (अ), (ब), (ड) व (ई) (4) वरील सर्व

---

**105.** कार्यासनातील नस्तीला दिल्या जाणाऱ्या शिर्षकाची विभागणी कोणकोणत्या भागात होते ?

(अ) शीर्षक (ब) उपशीर्षक किंवा उपशीर्षे (क) विषय

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (अ), (ब) (3) (अ), (ब), (क) (4) फक्त (अ) व (क)

---

**106.** 'कृषी संजीवनी' योजना कोणत्या विभागामार्फत जाहीर करण्यात आली ?

(1) जलसंपदा विभाग (2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग
(3) कृषी विभाग (4) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

---

**107.** जेव्हा शासनाची औपचारिक मंजुरी समान किंवा कनिष्ठ दर्जाच्या शासकीय अधिकाऱ्यास कळवायची असते तेव्हा महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने काढलेला मंजुरीचा औपचारिक आदेश म्हणजे काय ?

(1) ज्ञापन (2) परिपत्रक (3) अधिसूचना (4) शासन निर्णय

---

**108.** ज्या प्रकरणांमध्ये एखादा प्रकल्प पूर्ण होण्यावर औपचारिक लक्ष ठेवायचे असेल किंवा सदर प्रकरणामध्ये दुय्यम कार्यालयाकडून अंमलबजावणी करण्यात येत असेल तर अशा प्रकरणाचे वर्गीकरण कसे करावे ?

(1) प्रतिक्षाधीन (2) सुप्त प्रतिक्षाधीन (3) क वर्ग (4) ब वर्ग

---

**109.** महाराष्ट्रात महिला सक्षमीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत कोणत्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे ?

(1) देवयानी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम
(2) तेजस्वी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम
(3) तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम
(4) मनस्वी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**110.** राज्यात वैधानिक विकास मंडळे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ________ अन्वये निर्माण करण्यात आली आहेत.

(1) 370 (2) 371 (3) 361 (4) 161

---

**111.** योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | अपमृत्यू निर्णेता | (i) | ग्रामविकास व जलसंधारण विभाग |
| (ब) | शिक्षण उपकर | (ii) | नियोजन विभाग |
| (क) | सामाजिक वनीकरण | (iii) | गृह विभाग |
| (ड) | रोजगार हमी योजना | (iv) | महसुल विभाग |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

---

**112.** बलात्कार, लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्लापीडित महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणती योजना सुरू केली ?

(1) मनोधैर्य योजना (2) सुकन्या योजना

(3) जिजामाता योजना (4) सबला नारी योजना

---

**113.** सामान्यपणे मंत्रालयीन विभागांना विधानसभा आणि विधानपरिषद यांच्या कामकाजाच्या अनुषंगाने पुढील कोणकोणत्या बाबींबाबत कार्यवाही करावी लागते ?

(अ) विधानसभा/विधानपरिषद प्रश्न

(ब) विधानसभा/विधानपरिषद ठराव

(क) विधानसभा/विधानपरिषद सरकारी विधेयके

(ड) विधानसभा/विधानपरिषद बिनसरकारी विधेयके

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) (2) (अ), (क), (ड)

(3) (अ), (ब), (क), (ड) (4) (अ), (ब), (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

114. शिक्षा माफ करणे, शिक्षा तहकूब करणे किंवा माफी याबाबतची प्रकरणे आदेश काढण्यापूर्वी कोणाला सादर केली पाहिजेत ?

(1) सचिव (2) मंत्री (3) गृहमंत्री (4) मुख्यमंत्री व राज्यपाल

---

115. "अ" आणि "ब" वर्गीकरण केलेल्या फायली त्या बंद करण्यात आलेल्या वर्षानंतर किती वर्षांनी मंत्रालय अभिलेख कक्षाकडे पाठवाव्यात ?

(1) 5 वर्षे (2) 3 वर्षे (3) 2 वर्षे (4) 1 वर्ष

---

116. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्याच्या विनियोजन लेख्यासंबंधातील काम करण्यासाठी ________ समितीची स्थापना करण्यात येईल.

(1) लोकलेखा (2) अंदाज (3) विनियोजन (4) यांपैकी नाही

---

117. विधानपरिषद नियम 106 अन्वये ज्या ठरावांची सूचना ________ किंवा ________ यांनी दिलेली असेल त्या ठरावांना नियम 102 च्या तरतुदी लागू असणार नाहीत.

(1) सभापती, महाधिवक्ता (2) मंत्री, सभापती

(3) मंत्री, महाधिवक्ता (4) सभापती, मुख्य सचिव

---

118. निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवरील अल्पवेळ चर्चेसाठी अध्यक्षाकडून देण्यात येणारी कमाल वेळ किती ?

(1) मर्यादा नाही (2) अडीच तास

(3) एक तास (4) त्या दिवसाचे कामकाज संपेपर्यंत

---

119. विधानसभेतील "अर्धा तास चर्चा" बाबत पुढीलपैकी कोणते विधान असत्य आहेत ?

(अ) दर मंगळवारी व गुरुवारी त्या दिवसाच्या विधानसभेच्या बैठकीच्या शेवटी पुरेशा सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा होते.

(ब) अध्यक्ष संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्याच्या संमतीने नोटिस अनावश्यक ठरवू शकत नाहीत.

(क) विधानसभेपुढे कोणताही औपचारिक प्रस्ताव मांडण्यात येणार नाही किंवा मतदान घेण्यात येणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (ब) (2) (अ) व (ब) (3) (ब) व (क) (4) केवळ (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**120.** एखाद्या सदस्याने पुरवणी प्रश्न विचारला असेल तर ________.

(1) कोणत्याही परिस्थितीत संबंधित मंत्र्याने उत्तर दिले पाहिजे

(2) अध्यक्षांनी परवानगी दिली तरच उत्तर दिले पाहिजे

(3) उत्तर देण्यासाठी माहिती नसेल तर मंत्र्यांना उत्तर न देण्याची मुभा आहे

(4) पुढील बैठकीत, माहिती घेऊन उत्तर द्यावे

---

**121.** मागे घेण्यात आलेला ठराव त्याच अधिवेशनात खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत मांडता येतो ?

(1) 5 सदस्यांनी अनुमोदन दिल्यास (2) 7 सदस्यांनी अनुमोदन दिल्यास

(3) अध्यक्षांनी परवानगी दिल्यास (4) वरीलपैकी एकही नाही

---

**122.** खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(अ) एका सदस्याचे जास्तीत जास्त 3 प्रश्न एका दिवशी तोंडी उत्तरासाठी ठेवता येतात.

(ब) एकाच विषयावर वेगवेगळ्या सदस्यांनी स्वतंत्रपणे प्रश्न विचारले असतील तर ते स्वतंत्रपणे तोंडी उत्तरासाठी ठेवले जातात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (2) (ब) बरोबर (3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

---

**123.** विधानपरिषदेमध्ये निकडीच्या प्रश्नाचे उत्तर सदस्यास हवे असल्यास अशी सूचना अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वी किती दिवस आधी देणे आवश्यक असते ?

(1) जास्तीत जास्त पाच दिवस (2) जास्तीत जास्त दहा दिवस

(3) जास्तीत जास्त सात दिवस (4) जास्तीत जास्त एक दिवस

---

**124.** (अ) विधानपरिषदेमध्ये अर्धा तास चर्चेची सूचना देणारा सदस्य चर्चेच्या वेळी उपस्थित असणे बंधनकारक आहे.

(ब) अर्धा तास चर्चा चालू असतांना कोणत्याही सदस्यास प्रश्न विचारता येतो.

वरीलपैकी कोणते विधान चूक आहे ?

(1) (अ) (2) (ब) (3) दोन्ही (4) एकही नाही

---

**125.** एखादा ठराव मांडण्याची इच्छा असेल तो सदस्य अशासकीय सदस्यांचे ठराव निकालात काढण्यासाठी नेमलेल्या दिनांकापूर्वी ________ दिवसांची सूचना देईल.

(1) पूर्ण 12 (2) पूर्ण 14 (3) पूर्ण 7 (4) यांपैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

126. ठरावासंबंधी खालीलपैकी कोणती पद्धत अनुसरण्यात येते ?

(1) दाखल झालेल्या सर्व ठरावांचा अग्रक्रम लावून ते मांडण्यात येतात

(2) सदस्यांच्या ज्येष्ठतेनुसार ठराव मांडण्यात येतात

(3) चिठ्ठ्या टाकून ठराव निवडले जातात

(4) वरीलपैकी एकही नाही

---

127. कोणत्याही सदस्याला विधानसभेच्या एका अधिवेशनात जास्तीत जास्त किती ठरावांच्या नोटीसं पाठवण्यास परवानगी आहे ?

(1) एक (2) तीन (3) पाच (4) सात

---

128. विधान परिषद ठरावाच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(अ) एका सदस्याला वर्षभरात जास्तीत जास्त 5 ठराव मांडता येतात.

(ब) एका दिवशी एका सदस्याचे दोन ठराव चर्चेस घेता येतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) येथील (2) दोन्ही (3) एकही नाही (4) (ब) येथील

---

129. महाराष्ट्र विधानसभा नियम 1985 च्या नियम 86 अन्वये कोणता प्रश्न मांडता येतो ?

(1) अल्पावधी सूचना प्रश्न (2) अतारांकित प्रश्न

(3) तारांकित प्रश्न (4) वरील सर्व

---

130. लोकलेखा समितीच्या रचनेत विधानसभा व विधान परिषदेतील सदस्यांची संख्या अनुक्रमे किती असते ?

(1) कमाल 20 व कमाल 5 (2) किमान 20 व किमान 5

(3) किमान 15 व किमान 6 (4) कमाल 15 व कमाल 6

---

131. विधानसभेने अर्थसंकल्पीय अंदाज किंवा पूरक मागण्या अगोदरच मंजूर केल्या असल्यास अंदाज समिती त्याबाबतीत –

(1) समितीचे कामकाज थांबवेल (2) सल्ला देऊ शकेल

(3) सल्ला देऊ शकणार नाही (4) विधानसभेत पुन:श्च चर्चा घडवून आणेल

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

132. __________ हे विधानमंडळाच्या संयुक्तसमितीचे पदसिद्ध सदस्य असतात.

(1) विरोधी पक्षनेते (2) विधानमंडळाचे सचिव

(3) संबंधित विभागाचे सचिव (4) संबंधित विभागाचे प्रभारी मंत्री

---

133. विधानसभा आश्वासन समिति खालील समयी स्थापित होईल :

(1) दरवर्षीच्या पहिल्या अधिवेशनात

(2) यथास्थिती नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात

(3) वरील (1) व (2) प्रमाणे

(4) यथास्थिति पावसाळी व हिवाळी अधिवेशनात

---

134. महाराष्ट्र विधानसभा नियम क्र. 74 अन्वये __________ यांनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, 30 पेक्षा कमी नाहीत इतक्या पूर्ण दिवसांची तारांकित प्रश्नासंबंधीची सूचना देण्यात येईल.

(1) मुख्यमंत्री (2) सभापती (3) अध्यक्ष (4) यांपैकी नाही

---

135. विधान सभा नियम 86 अन्वये, अल्पावधी सूचना प्रश्नाचे उत्तर, आवश्यक ती माहिती बृहन्मुंबई बाहेरुन मिळविणे आवश्यक असल्यास त्या दिनांकापासून __________ दिवसांच्या आत देण्यात येईल.

(1) चौदा (2) सात (3) तीस (4) यांपैकी नाही

---

136. अल्पावधी प्रश्नाची सूचना सचिवाला मिळाल्यानंतर त्याने ती अध्यक्षांकडे किती दिवसात पाठविली पाहिजे ?

(1) दोन (2) सात (3) दहा (4) चौदा

---

137. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(अ) प्रश्नातील शब्दसंख्येवर मर्यादा नाही.

(ब) सदस्य प्रश्न विचारताना कारवाई संबंधी सूचना करू शकतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही चूक (2) दोन्ही बरोबर (3) (अ) बरोबर (4) (ब) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**138.** जेव्हा एखादा ठराव मांडण्यात येऊन त्यावर मतदान झाले असेल तेव्हा तशाच आशयाचा प्रश्न उपस्थित करणारा कोणताही ठराव किंवा सुधारणा, आधीच्या ठरावावर मतदान झाल्याच्या दिनांकापासून ________ कालावधीच्या आत मांडण्यात येणार नाही.

(1) सहा महिन्याच्या (2) 3 महिन्याच्या (3) एक वर्षाच्या (4) यापैकी नाही

---

**139.** खालीलपैकी कोणता अंदाजसमितीच्या कामकाजाचा भाग नाही ?

(1) पूरक मागण्यांची छाननी करणे
(2) पुनर्विनियोजन नियमानुसार आहे काय हे पाहणे
(3) काटकसरीचे उपाय सुचविणे
(4) वित्तीय प्रश्नांवर सरकारला सल्ला देणे

---

**140.** खालीलपैकी कोणत्या विषयावर विधानसभा सदस्यास अल्प वेळ चर्चा उपस्थित करता येईल ?

(अ) दलित हत्याकांड

(ब) राज्यात मोठ्या प्रमाणात होणारे अपघात

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) येथील
(2) (ब) येथील
(3) दोन्ही विषयावर
(4) वरीलपैकी कोणत्याच विषयावर नाही

---

**141.** (अ) मंत्री परिषद राज्य विधान परिषदेस सामुदायिकपणे जबाबदार असेल.

(ब) महाराष्ट्रात मंत्री परिषदेतील मंत्र्यांची एकूण संख्या विधान मंडळाच्या एकूण सभासदसंख्येच्या 15% पेक्षा जास्त असणार नाही.

(क) मंत्री परिषदेतील मुख्यमंत्री वगळता इतर मंत्र्यांची नियुक्ती मुख्यमंत्र्यांकडून करण्यात येते.

**योग्य विधाने शोधा :**

(1) (ब) (2) (ब) व (क) (3) (क) (4) सर्व चूक

---

**142.** (अ) राज्याच्या विधानमंडळामध्ये प्रलंबित असलेले विधेयक सभागृहांची सत्र समाप्ती झाल्याकारणामुळे व्यपगत होत नाही.

(ब) विधानसभेने पारित केलेले तथापि विधानपरिषदेत प्रलंबित असलेले विधेयक विधानसभेचे विसर्जन झाल्यास व्यपगत होत नाही.

(क) विधानपरिषदेने मंजूर केलेले तथापि विधानसभेत प्रलंबित विधेयक विधानसभेचे विसर्जन झाल्यास व्यपगत होते.

**योग्य विधाने कोणती ?**

(1) (ब) व (क) (2) (अ) व (ब) (3) (अ) व (क) (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**143.** विधान परिषदेतील सदस्यांची एकूण संख्या महाराष्ट्रात किती आहे ?

(1) 288 (2) 75 (3) 78 (4) 90

---

**144.** राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या सदस्यांच्या अपात्रतेसंदर्भात अंतिम निर्णय कोण घेतात ?

(1) विधानसभा अध्यक्ष (2) राज्यपाल

(3) विधानपरिषद सभापती (4) मुख्यमंत्री

---

**145.** राज्यपालांच्या नियुक्ती संदर्भात खालील विधानांबाबत योग्य पर्याय निवडा.

(अ) एकाच व्यक्तीची दोन किंवा अधिक राज्यांसाठी राज्यपाल म्हणून नियुक्ती करता येईल.

(ब) दोन किंवा अधिक व्यक्तींची एकाच राज्यासाठी राज्यपाल म्हणून नियुक्ती करता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) बरोबर (2) (ब) बरोबर

(3) (अ) व (ब) बरोबर (4) दोन्ही चूक

---

**146.** (अ) विधानसभा अध्यक्ष आपल्या पदाचा राजीनामा उपाध्यक्षास देतात.

(ब) विधानसभा विसर्जित होते तेव्हा, विसर्जनानंतर होणाऱ्या विधानसभेच्या पहिल्या सभेच्या लगतपूर्वीपर्यंत अध्यक्षाला आपले पद रिक्त करता येत नाही.

**योग्य विधाने ओळखा :**

(1) (अ) (2) (ब) (3) (अ) व (ब) (4) दोन्ही चूक

---

**147.** राज्याच्या विधानपरिषदेमध्ये सदस्यांच्या एकूण संख्येपैकी ________ सदस्य हे त्या राज्यातील नगरपालिका, जिल्हा मंडळे व संसद कायद्याद्वारे विनिर्दिष्ट करील अशी अन्य स्थानिक प्राधिकरणे यांचे सदस्य मिळून बनलेल्या मतदारगणांकडून निवडून दिले जातील.

(1) एक बारांश (2) एक तृतीयांश (3) एक षष्ठांश (4) दोन तृतीयांश

---

**148.** अनुच्छेद 333 च्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक राज्याची विधानसभा, राज्यामधील क्षेत्रीय मतदार संघामधून प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे निवडलेले जास्तीत जास्त ________ व कमीत कमी ________ इतके सदस्य मिळून बनलेली असेल.

(1) 400, 70 (2) 600, 90 (3) 500, 60 (4) 550, 55

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**149.** विधानमंडळ सदस्यांच्या अपात्रतेबाबतच्या प्रश्नावरील निर्णय कोणत्या अनुच्छेदानुसार घेतला जातो ?

(1) अनुच्छेद 190 (2) अनुच्छेद 191 (3) अनुच्छेद 192 (4) अनुच्छेद 193

---

**150.** ज्या राज्यांच्या विधानमंडळात दोन सभागृहे आहेत अशी राज्ये खालीलपैकी कोणती आहेत ?

(1) बिहार, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, गोवा

(2) बिहार, मध्य प्रदेश , मनीपूर, केरळ, महाराष्ट्र

(3) बिहार, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, राजस्थान, हरियाणा

(4) बिहार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलतः प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial